**नियमित दिवाणी दावा क्रमांक १००८/२०१५**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१४९९-२०१५)

**नि.क्र.३१ वरील आदेश**

प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियत दुरूस्तीस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे अर्जातील कथन थोडक्यात असे, वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटप आणि मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादींनी नि. १५ वर कैफियत दाखल केली आहे, परंतु सदर कैफियत पान क्र.४ परिच्छेद क्र.१० मध्ये सदरच्या दाव्यातील वादीचे वडिल बजाबा शंकर पवार आणि प्रतिवादींचे वडिल यांचेत फेर नंबर २१३६ प्रमाणे दि.२५/१०/८२ रोजी झालेल्या वाटपानुसार नोंद झाली व त्या वाटपाप्रमाणे वादीचे वडिल व प्रतिवादी हे विभक्त राहु लागले हा मजकुर अनावधानाने समाविष्ट झाला आहे आणि त्यामुळे तांत्रिक दोष झाल्याने प्रतिवादीस वस्तुस्थितीप्रमाणे न्याय मिळणार नाही. सबब सदर मजकुर कमी करुन त्यामध्ये अर्जात नमुद केलेला दुरुस्त मजकुर समाविष्ट करण्याची आणि त्याअनुषंगाने कैफियत दुरुस्त करण्याची परवानगी मिळावी अशी मागणी प्रतिवादीं यांनी केली आहे. सदर दुरूस्तीमुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा कैफियतीचे मुळ स्वरुप बदलणार नाही. सबब, अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना कैफियत दुरूस्तीस परवानगी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे सदर अर्जास वादींनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. वादी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, अर्जातील कथनाप्रमाणे प्रतिवादींनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. कैफियत दुरुस्तीकरिता कारण घडलेले नाही. प्रतिवादींच्या मागणीप्रमाणे कैफियत दुरुस्ती केल्यास कैफियतीच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे, त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजुर करावा. यदाकदाचित अर्ज मंजुर करावा असे मत झाल्यास तो जबर खर्चासह मंजुर करावा अशी विनंती वादींनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचले व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा प्रतिवादींविरुध्द वाटप करून कब्जा तुटक होवुन मिळण्याकरीता तसेच निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या म्हणण्याप्रमाणे,

वस्तुस्थितीप्रमाणे मजकुर त्यांचे कैफियतमध्ये नमुद करणे आवश्यक आहे त्याकरिता अर्जातील नमुद मजकुर समाविष्ट करणे आणि पुर्वीचा मजकुर वगळणे दाव्याच्या योग्य निर्णयाकरिता आवश्यक ठरणार आहे, याउलट वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीच्या कथनानुसार नवीन मजकुर समाविष्ट केल्यास त्याने कैफियतीचे मुळ स्वरुप बदलणार आहे. दावा वाटपाचा आहे, प्रतिवादी क्र. १ ते ३ समाविष्ट करु पाहणा-या, आणि वगळु इच्छिणा-या मजकुराचे स्वरुप पाहता तो कब्जेवहिवाटी बाबत कथन करणारा आहे जो की, दाव्याच्या दोन्ही पक्षकारांतील वादाचे समुळ निकालाकरिता आवश्यक आहे. प्रतिवादींनी मागितलेली दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असुन त्यामुळे वादींचे अधिकारावर देखील गदा येणार नाही. सदरची कैफियत प्रतिवादींनी सन २०१५ सालीच दाखल केलेली आहे म्हणजेच त्यांनी कैफियत दुरुस्ती अर्ज दाखल करणेस बराचसा विलंब केला आहे तसेच प्रस्तुत दाव्यामध्ये मुददे देखील उपस्थित केलेले आहेत. परंतु सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्याकरिता व याकामी पुन्हा पुन्हा दावे उपस्थित होवू नयेत या कारणाकरिता प्रतिवादींवर खर्च लादुन अर्ज मंजुर करणे न्यायोचीत होईल असे मला वाटते. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज रक्कम रूपये २,०००/- खर्च लादून मंजुर करण्यात येत आहे. सदरचा खर्च वादींना देण्यात यावा.

२. प्रतिवादींनी सदरची दुरूस्ती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी.

BABAR SANGITA PUNDLIK
Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2024.12.20 17:29:19 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २०.१२.२०२४.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.